
- 2 NOV 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मनमोहन शर्मा पुरस्काराचे डॉ. तुकाराम डोंगळे मानकरी

## मराठी विज्ञान परिषदेची घोषणाः पुरस्कार मिळविणारे शिवाजी विद्यापीठातील पहिले शिक्षक



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील डॉ. तुकाराम डोंगळे यांना प्रा. मनमोहन शर्मा पुरस्कार जाहीर झाला. त्याबद्दल कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी ग्रंथ देऊन त्यांचे अभिनंदन केले. यावेळी शेजारी गजानन पळसे, विलास शिंदे, जगदीश सपकाळे, आलोक जत्राटकर उपस्थित होते.

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागातील डॉ. तुकाराम डोंगळे यांना मराठी विज्ञान परिषदेचा 'प्रा. मनमोहन शर्मा विज्ञान-तंत्रज्ञान पुरस्कार-२०२३' पुरस्कार जाहीर झाला आहे. कमी वयात तसेच हा पुरस्कार मिळविणारे शिवाजी विद्यापीठातील ते पहिलेच शिक्षक आहेत.

एक लाख रुपये रोख, सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असून त्याचे वितरण मराठी विज्ञान परिषदेच्या अखिल भारतीय मराठी विज्ञान अधिवेशनात केले जाते. डॉ. डोंगळे हे स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी या अधिविभागात नॅनो-इलेक्ट्रॉनिक्स विषयाचे तज्ज्ञ अध्यापक आहेत. त्यांचे संशोधन प्रामुख्याने मेमरी डिव्हायसेस, न्यूरोमॉर्फिक कॉम्प्युटिंग व कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रात असून ते राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीयस्तरावर मान्यताप्राप्त आहे. अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने जाहीर केलेल्या जागतिक स्तरावरील आघाडीच्या २ टक्के शास्त्रज्ञांमध्ये डॉ. डोंगळे यांचा समावेश आहे. सुमारे १६० पेक्षा अधिक शोधनिबंध, ३ पुस्तके व ११ पेटंट त्यांच्या नावे नोंद आहेत.

Scanned with OKEN Scanner

- 2 NOV 2023 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सरदार पटेल जयंतीनिमित्त विद्यापीठात एकता दौड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्ताने त्यांच्या स्मृतींना



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात एकता दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे एकता रॅली काढण्यात आली. फ्लॅग-ऑफ करून रॅलीस प्रारंभ करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.**

शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत एकता दौडचे आयोजन करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात मंगळवारी (दि. ३१) सकाळी सरदार वल्लभभाई पटेल आणि इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांचे पूजन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते झाले. तत्पूर्वी, राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे मुख्य प्रशासकीय भवनापासून एकता दौड झाली. कुलगुरू डॉ. शिर्के, कुलसचिव डॉ. शिंदे यांनी फ्लॅग-ऑफ करून एकता दौडचे उद्घाटन केले. दौडनंतर सर्व उपस्थितांना एकता व सद्भावना यांची शपथ देण्यात आली.

यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे समन्वयक डॉ. किरणकुमार शर्मा, अमोल कुलकर्णी आदी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 2 NOV 2023

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात एकता दौड

**कोल्हापूर :** भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा स्मृतिदिन यानिमित्ताने या महान नेत्यांच्या स्मृतींना शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत एकता दौड आयोजित करण्यात आली. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात आज सकाळी सरदार वल्लभभाई पटेल आणि इंदिरा गांधी यांच्या प्रतिमांचे पूजन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. तत्पूर्वी राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे विद्यापीठ प्रांगणात मुख्य प्रशासकीय भवनापासून एकता दौड आयोजित करण्यात आली. कुलगुरू डॉ. शिर्के आणि कुलसचिव डॉ. शिंदे यांनी फ्लॅग-ऑफ करून एकता दौडीचे उद्घाटन केले. दौडीनंतर सर्व उपस्थितांना कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत एकता व सद्भावना यांची शपथ देण्यात आली. यावेळी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. शरद बनसोडे, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. किरणकुमार शर्मा, अमोल कुलकर्णी आदी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 2 NOV 2023
लोकसत्ता

# कोल्हापुरात आजपासून भाषांतरकारांची परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि भारतीय अनुवाद साहित्य, ओडिसा यांच्या संयुक्त विद्यमाने आजपासून 'भाषांतरकारांची राष्ट्रीय परिषद' विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर, भाषाभवन सभागृहात आयोजित केली आहे. याचे उद्‌घाटन लेखक डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या हस्ते व कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या वेळी भाषांतरकार डॉ. माया पंडित, भारतीय अनुवाद साहित्य संस्थेचे सचिव सरत चंद्र आचार्य हे मार्गदर्शन करणार आहे.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 NOV 2023

लोकमत



विद्यापीठस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत सर्वसाधारण विजेत्या संघाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. प्रल्हाद जाखले यांनी अभिनंदन केले.

# बुद्धिबळ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघास विजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत विद्यापीठाच्या संघाने सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. त्याचबरोबर विद्यापीठाच्या बीए-स्पोर्ट्सचा विद्यार्थी आदित्य मुकुंद सावळकर याने स्पर्धेत वैयक्तिक प्रथम क्रमांक पटकावून आंतरविभागीय स्पर्धेमध्ये प्रवेश मिळवला.

विजेत्या संघाचा सत्कार विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांच्या हस्ते केला. विजयी संघामध्ये आदित्य मुकुंद सावळकर याच्यासह सत्यजित सुरेश माने, राहुल मरगू लोखंडे, श्रीधर शिवाजी निंबाळकर यांचा समावेश आहे. सातारा येथे आंतरविभागीय बुद्धिबळ स्पर्धेत आदित्य सावळकर याने चतुर्थ क्रमांक पटकावला. त्याची पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली.

Scanned with OKEN Scanner


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 2 NOV 2023
पुढारी

# विद्यापीठस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघास विजेतपद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत विद्यापीठ संघाने सर्वसाधारण विजेतपद पटकावले. बीए-स्पोर्टस्‌चा विद्यार्थी आदित्य मुकुंद सावळकरने स्पर्धेत वैयक्तिक प्रथम क्रमांक पटकावून आंतरविभागीय स्पर्धेत प्रवेश मिळविला.

विजेत्या संघाचा सत्कार कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांच्या हस्ते करण्यात आला. विजयी संघामध्ये आदित्य मुकुंद सावळकर, सत्यजित सुरेश माने, राहुल मरगू लोखंडे आणि श्रीधर



शिवाजी निंबाळकर यांचा समावेश आहे. यानंतर सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा येथे झालेल्या आंतरविभागीय बुद्धिबळ स्पर्धेत आदित्य मुकुंद सावळकर याने चतुर्थ क्रमांक पटकावला. त्याची पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघात निवड झाली. क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with OKEN Scanner


- 2 NOV 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परीक्षार्थीवर भरारी पथकांचा वॉच

- शिवाजी विद्यापीठाकडून संवेदनशील २४ परीक्षा केंद्रे ताब्यात
- रोज कॉपीची सुमारे ५० प्रकरणे उघडकीस : कॉपीबहाद्दरांना धास्ती



दोन वर्षापासुन शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने अतिसंवेदनशील २४ परीक्षा केंद्रे ताब्यात घेतली आहेत. बैठ्या पथकासह भरारी पथकाने या केंद्रांतील परीक्षार्थीवर करडी नजर ठेवली आहे. परीक्षा विभागाने नियमांची कडक अंमलबजावणी केल्याने दररोज कॉपीची सुमारे ५० प्रकरणे उघडकीस येत आहेत. कॉपीबहाद्दरांनी विद्यापीठाच्या कारवाईची धास्ती घेतल्याचे हे चित्र आहे.

**तरुण भारत संवाद**
**विशेष वृत्त**

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ प्रशासनाच्या सतर्कतेमुळे दोन वर्षात पाच ते सहा ठिकाणी झालेल्या पेपर फुटी प्रकारावर कडक कारवाई झाली आहे. प्रशासन एसआरपीडीच्या माध्यमातून महाविद्यालयांना प्रश्नपत्रिका पाठवते. याचाच फायदा घेत काही प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेपुर्वीच प्रश्नपत्रिका पाठवल्याचा प्रकार उघडकीस आला होता. त्यामुळे महाविद्यालयातील एसआरपीडीच्या समन्वयकांसह दोषींवर परीक्षा प्रमाद समितीने कडक कारवाई केली. पण सध्या सुरू झालेल्या परीक्षेतील कॉपीबहद्दरांचे प्रमाण वाढले आहे.

या कॉपीबहाद्दरांना चाप बसवण्यासाठी प्रशासनाने प्रत्येक जिल्ह्यात तीन भरारी पथके नियुक्ती केली. प्रत्येक परीक्षा केंद्रावर बैठ्या पथकाची नियुक्ती केली. त्यामुळे परीक्षेदरम्यान परीक्षा हॉलमधील विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या कसून तपासणीमुळे कॉपीबहाद्दरांमध्ये भीतीचे वातावरण आहे. परीक्षा प्रमाद समितीने यापुर्वी कॉपीबहाद्दरांवर कडक कारवाई केली आहे. काहींना १ ते २ वर्षे परीक्षा देण्यास बंदी केल्याचा धसका कॉपीबहद्दरांनी घेतला आहे. परंतु विद्यापीठाने ताब्यात घेतलेल्या अतिसंवेदनशील २४ केंद्रांवर मात्र रोज कॉपीचे प्रकार उघडकीस येत आहेत.

परीक्षा विभागाने पेपर फुटीचा प्रकार अतिशय गांभीर्याने घेतल्याने संबंधीत महाविद्यालयांना प्राध्यापक, कर्मचाऱ्यांवर कारवाईशिवाय पर्याय उरला नाही. परीक्षा विभाग, परीक्षा प्रमाद समितीच्या कारवाईने काही महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनी एसआरपीडीचा गैरवापर केल्यास त्यांच्या नोकरीवर गदा येणार आहे. शासनाचे वेतन घेणाऱ्यांनी नियमाचे उल्लंघन केल्यास त्यांनाही घरचा रस्ता दाखवला जाणार आहे. त्यामुळे परीक्षा सुलभ होण्यासाठी एसआरपीडीचा वापर महाविद्यालयांनी विद्यापीठाचे नियम पाळून करणे गरजेचे आहे, अशी चर्चा शिक्षण क्षेत्रात आहे.

परीक्षा केंद्रांवर भरारी पथकांची नियुक्ती केल्याने कॉपी पकडण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे दररोज ५० पेक्षा जास्त कॉपीचे प्रकार उघडकीस येत आहेत. भरारी पथकांनी पकडलेल्या संशयितांची परीक्षा प्रमाद समितीसमोर सुनावणी घेतली जाईल. सुनावणीनंतर परीक्षा प्रमाद समितीने दिलेला निकाल अंतिम असणार आहे. त्यामुळे परीक्षा प्रमाद समिती दोषींवर काय कायवाई करणार, याकडे लक्ष लागले आहे.

## कॉपीमुक्त अभियान उपक्रमास यश

विद्यापीठ परीक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील प्रत्येक परीक्षा केंद्रावर भरारी पथकांची नियुक्ती केली आहे. भरारी पथकांनी कॉपीबहाद्दरांना चांगलाच धडा शिकवला आहे. कॉपीमुक्त अभियान उपक्रमास यश आले आहे. दोषींवर परीक्षा प्रमाद समितीच्या नियमानुसार कारवाई केली जात आहे.

**डॉ. अजितसिंह जाधव (संचालक, परीक्षा व मूल्यमापन समिती, शिवाजी विद्यापीठ)**

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 NOV 2023

सकाळ

# हुपरीतील महाविद्यालयाची विद्यापीठाच्या पथकातर्फे तपासणी

कोल्हापूर, ता. १ : हुपरी येथील महाविद्यालयातील परीक्षा केंद्राची आज शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या पथकाने अचानक तपासणी केली. त्यामध्ये या केंद्रात परीक्षा कामकाजात अनियमितता दिसून आली.

पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या हिवाळी सत्रातील परीक्षा सध्या सुरू आहेत. त्यातील प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या परीक्षा महाविद्यालयाकडून घेण्यात येत आहेत. हुपरी येथील एका महाविद्यालयातील केंद्रावर नियमानुसार परीक्षा होत नसल्याची तक्रार विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाकडे झाली होती. त्याची दखल घेऊन या मंडळाच्या तीन सदस्यीय पथकाने आज संबंधित महाविद्यालयाला अचानक भेट दिली. त्यामध्ये विद्यार्थी शिक्षकांना ओळखपत्र, विद्यार्थ्यांची वर्गातील बैठक व्यवस्था, आवश्यक असणाऱ्या भौतिक सुविधा, आदींबाबत अनियमितता दिसून आली. याबाबत पथकाने महाविद्यालय प्रशासनाला सूचना दिल्या आहेत. विद्यापीठाच्या परीक्षा प्रमाद समितीला हे पथक पाहणीचा अहवाल सादर देणार आहे. त्यानंतर समिती पुढील कार्यवाही करणार आहे.दरम्यान, विद्यापीठाच्या भरारी पथकाने आज एकूण ६६ विद्यार्थ्यांना कॉपी करताना पकडले. त्यात सातारा जिल्ह्यातील ४८, कोल्हापूरमधील १६ आणि सांगली जिल्ह्यातील २ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 NOV 2023

पुढारी

# विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेला ३८ हजार विद्यार्थी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील २३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. ३८ हजार ९७ विद्यार्थ्यांपैकी १६०९ विद्यार्थी गैरहजर होते. बॅचलर ऑफ कॉमर्स, आर्टस्, मास्टर ऑफ कॉमर्स, बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, एज्युकेशन, सायन्स, कॉमर्स ॲंड मॅनेजमेंट, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ लायब्ररी ॲंड इन्फॉर्मेशन सायन्स, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, मास्टर ऑफ रूरल स्टडीज, बॅचलर ऑफ डिफेन्स स्टडीज आदी परीक्षा झाल्या. २७ गैरप्रकारांची नोंद झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 2 NOV 2023

पुढारी

# विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेसाठी विद्यापीठाचा संघ रवाना

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

इंदौर (मध्य प्रदेश) येथील अहिल्यादेवी विद्यापीठात ४ ते ८ नोव्हेंबर या कालावधीत होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ रवाना झाला.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी संघाला उत्तम कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या. कबड्डी संघात मार्गदर्शक म्हणून डॉ. रमेश भेंडिगिरी, डॉ. डी. बी. बिरनाळे, अजित शेळके संघ व्यवस्थापक म्हणून काम पाहत आहेत.

विद्यापीठाचा कबड्डी संघ असा : साईप्रसाद तुकाराम पाटील (शाहू कॉलेज, कोल्हापूर), वैभव सातप्पा रबाडे (शाहू कॉलेज, कोल्हापूर), प्रतिक शामराव पाटील (शाहू कॉलेज, कोल्हापूर), सौरभ तानाजी फगरे (नाईट कॉलेज, इचलकरंजी), दीपक पांडुरंग पाटील (नाईट कॉलेज, इचलकरंजी), वैभव अधिकराव वाघमोडे (नाईट कॉलेज, इचलकरंजी), हृषीकेश विलास जाधव (बी. एम. कॉलेज, रहिमतपूर), शुभम माणिक पाटील (बी.एम. कॉलेज, रहिमतपूर).

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 NOV 2023
लोकमत

# कबड्डी स्पर्धेसाठी विद्यापीठाचा संघ इंदौरला रवाना

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** इंदौर (मध्य प्रदेश) येथील अहिल्यादेवी विद्यापीठात येत्या ४ ते ८ नोव्हेंबर या कालावधीत होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ रवाना झाला. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, तसेच क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी या संघाला उत्तम कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या. कबड्डी संघात मार्गदर्शक म्हणून डॉ. रमेश भेंडिगरी, डॉ. डी. बी. बिरनाळे, अजित शेळके संघ व्यवस्थापक म्हणून काम पाहत आहेत.

कबड्डी संघ असा : साईप्रसाद पाटील (शाहू कॉलेज, कोल्हापूर), वैभव रबाडे (शाहू कॉलेज, कोल्हापूर), प्रतीक पाटील (शाहू कॉलेज), सौरभ फगरे (नाइट कॉलेज), दीपक पांडुरंग पाटील, वैभव अधिकराव वाघमोडे (नाइट कॉलेज), ऋषिकेश विलास जाधव व शुभम पाटील (बी. एम. कॉलेज, रहिमतपूर).

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 2 NOV 2023
सकाळ



**कोल्हापूर :** जयसिंगपूर येथे झालेल्या विभागीय बुद्धिबळ स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविलेला कमला कॉलेजच्या महिला संघ. सोबत डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्यासह मार्गदर्शक शिक्षक.

# बुद्धिबळ स्पर्धेत कमला कॉलेज द्वितीय

**कोल्हापूर :** जयसिंगपूर येथील जे. जे. मगदूम इंजिनिअरिंग कॉलेज येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठांतर्गत विभागीय बुद्धिबळ स्पर्धेत कमला कॉलेजच्या महिला बुद्धिबळ संघाने द्वितीय क्रमांक मिळविला. मयुरी सावळकरची सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय सातारा येथे होणाऱ्या आंतरविभागीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली. संघात मयुरीबरोबर मानसी जितकर, सादिया बारस्कर, शीतल डोंगरे, स्नेहा चांदोले, केतकी मोरेचा समावेश होता. खेळाडूंना ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर यांचे प्रोत्साहन लाभले. शारीरिक शिक्षण संचालक ज्योती लेंगरे यांचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with OKEN Scanner